## मिलिंद अनंत तोरो

मी १९७३ साली प्रथम वारणानगरमध्ये प्रवेश केला तेव्हा ती एक अद्भुत नगरीच होती. प्रथमदर्शनी प्रेमात पडावे अशी. जणु वाळवंटातले Oasis. खरे तर अगदी परवा-परवापर्यंत वारणेचा माळ सत्तू भोसले नावाच्या दरोडेखोराच्या नावाशी जोडला गेलेला होता. त्याच्या जीवनावरचा "वारणेचा वाघ" हा प्रसिद्ध सिनेमा जणू वारणा खोऱ्याची डॉक्युमेंटरीच होता. पण तात्यासाहेब कोरे नावाच्या दूरदर्शी आणि महत्त्वाकांक्षी नेत्याच्या सहकार चळवळीतील अभिनव प्रयोगामुळे व कष्टांमुळे हा माळ आता अचानक एक आधुनिक आणि सुसंस्कृत वसाहत झाला होता. "वारणानगर" हे नावच किती आकर्षक आणि अभिनव होते! गुळगुळीत डांबरी रस्ते, वास्तुशास्त्राची आधुनिक तंत्रे वापरून बांधलेली सुबक घरे व इमारती, वीज/पाणी अशा सर्व नागरी सोयी, सर्वच काही impressive होते. पण सर्वात मोहून टाकणारी गोष्ट म्हणजे सर्वत्र लावलेली सुंदर झाडे. वारणानगरमध्ये सर्व रस्त्यांवर दुतर्फा वृक्षराजी होती. प्रत्येक घराच्या भोवती छोटी का असेना बाग होती. मारूतीच्या देवळाभोवती हिरवाई होती. एव्हढेच नव्हे कॉलेजच्या मागे अत्याधुनिक बोटॅनिकल गार्डन होते – जिथे मी इतरत्र कुठेही न पाहिलेला काळा चाफा होता!

अगदी खालचा एस.टी. स्टँड – जिथे प्रवाश्यांचे/नवागतांचेआगमन होई – ते अगदी वरचे सुमारे दीड किलोमीटर अंतरावरचे श्री वारणा महाविद्यालय यांना जोडणारा एकच दुहेरी रस्ता होता. वृक्षराजीने सुशोभित अशा या रस्त्याने चालत निघाले की उजवीकडे शास्त्री भवन या नावाचा मल्टि-पर्पज हॉल, प्राथमिक शाळा, डावीकडे कारखान्यात काम करणाऱ्यांची सिमेंट कॉलनी, पुढे उजवीकडे कारखान्याच्याच मॅनेजर्स व एक्झेक्युटिव्ह लोकांचे टुमदार बंगले, अशी सुरूवात होई. इथून आमची कॉलेजच्या प्राध्यापकांची कॉलेज कॉलनी गावाच्या अगदी दुसऱ्या टोकाला होती. सहा दुमजली

क्वार्टर्समध्ये सर्व विवाहित प्राध्यापक राहात. आमचा फ्लॅट पाच नंबरच्या बिल्डिंगमध्ये वरच्या मजल्यावर होता.

नवीन घरी थोडे सेटल झाल्यावर मी संध्याकाळी बाहेर आलो. शेजारच्या चार नंबरच्या बिल्डिंगसमोर ७-८ मुले क्रिकेट खेळत होती. बिल्डिंगचाच एक भाग स्टंप्स असल्याने विकेटकीपरची गरज नव्हती. मी काही वेळ त्यांचा खेळ दूर उभा राहून पाहात राहिलो. थोड्या वेळाने त्यांच्यातला एक मुलगा हात करून व ओरडून मला म्हणाला, "ये की रे खेळायला!"

ही माझी आणि मिलिंदची पहिली भेट. मिलिंदचा प्रेमळ स्वभाव व सर्वांना समाविष्ट करून घेण्याची सवय यांची ही पहिली चुणूक होती. मिलिंदने स्वतःची व इतरांची ओळख करून दिली. मी लगेचच त्यांच्या खेळात सामील झालो – अर्थात फिल्डिंग करायला. एक-दोन कॅच सोडल्यामुळे इतर काही मुलांच्या शिव्या खाल्ल्याचे आठवते. पण तरी त्या दिवशी माझा कॉलेज कॉलनी गँगमध्ये प्रवेश झाला आणि नवीन गावात आल्यानंतरचे माझे एकटेपण एका दिवसातच संपले असे म्हणता येईल.

मिलिंद तोरोचे वडिल मराठीचे प्राध्यापक व विभागप्रमुख होते. मिलिंद माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा म्हणजे इयत्ता आठवीत होता. गोरापान, नाजुक कांतीचा चेहरा आणि घारे, शांत टपोरे डोळे असलेला मिलिंद नक्कीच हँडसम होता. दुर्दैवाने Cleft lip या जन्मजात दोषामुळे मिलिंदचे बोलणे नवख्या माणसाला समजायला थोडे कठीण जायचे. पण त्या दोषामुळे मिलिंदच्या आत्मविश्वासावर परिणाम झाला आहे असे त्यावेळी किंवा नंतर कधीही मला जाणवले नाही. किंबहुना, या लेखात खाली उल्लेख केल्याप्रमाणे मिलिंदने नंतर त्याच्या आयुष्यात फर्ड्या वक्त्यांनाही कदाचित कठीण वाटतील अशा गोष्टी केल्या.

कॉलेज कॉलनीचा मिलिंद अनभिषिक्त राजा होता. वीणा पोंदे मिलिंदपेक्षा मोठी होती पण ती आमच्यात कधीच नसायची. त्यामुळे शिंगटे सरांचा दिलीप सोडल्यास – ज्याच्या मेंदूवर परिणाम झाल्याने तो थोडा वेडसर आहे असे मला सांगण्यात आले – आमच्या कॉलनीत मिलिंद सर्वात सिनीयर होता. त्याच्याच वयाचे सतेज आणि स्वाती माझे शेजारी म्हणजे चार नंबर बिल्डींगमध्ये राहायचे. बाकी सगळे चिल्लेपिल्ले होते. मिलिंद आमच्या ग्रूपचा लीडर होता आणि तो सर्वांना कुशलतेने सांभाळायचा. तो स्वतः अत्यंत शांत, समंजस प्रकृतीचा होता, त्यामुळे भांडणे मिटवणे हे त्याला सहज जमायचे. मिलिंद स्वतः हुशार होताच, आणि त्याची बॅच वारणानगरमध्ये प्रसिद्ध होती. राजीव कोरे, स्वाती बापट असे अतिरथी, महारथी स्कॉलर विद्यार्थी या बॅचमध्ये होते. नाईकसाहेबांचा नीलेश – म्हणजे आमच्या वाद्यवृंदाचा म्होरक्या – हाही मिलिंदबरोबरचाच.

तोरो मंडळी मूळची कर्नाटकातली. मिलिंदचे वडिल अत्यंत मार्दवशील स्वभावाचे, मितभाषी असे होते. ते मराठीचे प्राध्यापक असले तरी कन्नड भाषेतही प्रथितयश होते. कन्नड भाषेत त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. तोरो सर मराठी विभागाचे प्रमुख होते आणि त्यांनी मला बारावीत थोडे शिकवले देखील. बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेच्या आधी एक prelim नावाची परीक्षा कॉलेजमध्येच घेतली जाई व कॉलेजचेच प्राध्यापक पेपर तपासत. त्या परीक्षेचा माझा मराठीचा पेपर तोरो सरांनी पाहिला आणि ते नंतर माझ्या वडिलांना म्हणाले, “असे छान मराठी आमच्या बी.ए. च्या विद्यार्थ्यांकडून देखील क्वचितच पाहायला मिळते.” तोरो सरांनी केलेली ही प्रशंसा माझ्यासाठी कुठल्याही छापील सर्टिफिकेटपेक्षा मौल्यवान आणि अभिमानास्पद होती.

मिलिंदची आई, म्हणजे तोरोबाई आम्हाला शाळेत संस्कृत शिकवत. Dignified presence म्हणजे काय याचे तोरोबाई मूर्तिमंत उदाहरण होत्या. त्यांच्या वागण्या-बोलण्यात मार्दव होते, चेहऱ्यावर ज्ञानाचे तेज होते, आणि

कोणाचाही थिल्लरपणा कोसो दूर पळून जाईल असा त्यांचे व्यक्तिमत्व होते. आम्हाला हिंदी-संस्कृत असा ५०-५० मार्कांचा विचित्र combined विषय होता. तोरोबाईंनी आम्हाला संस्कृतची गोडी लावलीच, शिवाय गणितासारखे धपाधप मार्क कसे मिळवायचे हे तंत्रही दाखवले. त्यामुळे हिंदीत – माझा नावडता विषय – जितके माझे गुण कमी असायचे तेव्हढीच गुणांची भरपाई मी संस्कृतमध्ये करू शकायचो.

असे उच्चशिक्षित आणि भाषाप्रेमी आईवडिल असल्यावर मिलिंदमध्ये साहित्यगुण येणे अपरिहार्य होते. शाळेत असल्यापासूनच मिलिंद लेखक-कवी होता आणि अजूनही आहे. त्याने पुढे वारणानगरमध्ये चक्क एक नाटककंपनी काढली. मिलिंद स्वत: लेखक व सहदिग्दर्शक आणि बाकीचे – प्रताप सरनाईक, विजय पवार, ज्ञानेश्वर मुळे इत्यादी – अभिनेते, अशी स्थानिक कलावंतांची नाटके आम्हाला शास्त्रीभवनमध्ये पाहायला मिळू लागली. अगदी अलीकडे मिलिंदचे काव्यप्रभुत्व मला पुन्हा एकदा अनुभवण्यास मिळते आहे. तो इंग्लिशमधील उत्तमोत्तम कवितांचे अतिशय सुंदर मराठीत रूपांतर – काव्यरूपातच – करतो आहे, आणि मी त्याच्या या प्रवासात सहभागी होऊन त्या सुंदर कविता वाचण्याचा आनंद लुटतो आहे.

कॉलेजच्या वयाचे झाल्यावर (म्हणजे १० वी नंतर) मिलिंदची आणि माझी मैत्री अजून घट्ट झाली. दोघे मिळून संध्याकाळी चालत फिरायला जाणे हा आमचा सर्वात आवडता उद्योग. त्या काळात टू-व्हीलर हा प्रकार वारणानगरमध्ये फारसा नव्हता. असली तर सायकलच. आम्ही कॉलेज कॉलनीपासून चालत निघत असू. तिथून बहिरेवाडी फाटा, मग पुढे गाडीतळ लागे – जिथे कारखान्यात ऊस पुरवायला आलेल्या बैलगाड्या, ट्रॅक्टर इत्यादी येऊन त्यांचा नंबर लागेपर्यंत थांबत. नंतर उजवीकडे वारणेचा मेन स्ट्रीट लागे – जिथे धनंजय स्टोअर्स, मिसाळ कँटीन अशा नावाची रंगीबेरंगी दुकाने आम्हाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत. असे

सगळे पाहात-पाहात, रमतगमत आम्ही मुख्य चौकात पोहोचत असू. इथून पुढे वारणानगरची खरी वसाहत – residential area – सुरू होई. त्यामुळे आम्ही अधिक सतर्क होऊन, कोणी ओळखीचे दिसतेय का हे शोधत आमचा वॉक चालू ठेवत असू.

शेवटचा स्टॉप म्हणजे वारणानगरमधली latest addition वारणा बझार असे. ज्या काळात मॉल हा प्रकारच सगळ्या देशाला नवीन होता, त्या काळात "वारणा बझार" – जिथे दैनंदिन जीवनात लागणाऱ्या सर्व वस्तू मिळत – वारणानगरसारख्या छोट्या गावात असणे हे वारणानगरच्या आधुनिकतेचे आणि अभिनवतेचे अजून एक लक्षण होते. खुद्द बझारमध्ये खरे तर मिलिंदला आणि मला काहीच काम नसे. कारणाशिवाय खरेदी करत राहाणे हे आजच्यासारखे खूळ त्या काळात नव्हते. आमचे मुख्य आकर्षण एकच – ओळखीचे चेहरे शोधणे आणि त्यांच्याकडून एखादे स्मिततरी वसूल करण्याचा प्रयत्न करणे! माझ्या वर्गातली अरूणा चिखलकर पुढे बझारमध्ये Accounts मध्ये कामाला लागली. त्यामुळे खालच्या मजल्यावरच्या त्या Accounts विभागात जाऊन अरूणाला किमान hello करणे किंवा तिला वेळ असेल तर कपभर चहा पीत गप्पा मारणे हे मी माझे परमकर्तव्य समजत असे. सुदैवाने अरूणाही दयाळू असल्याने सहसा मला झिडकारत नसे.

वारणा बझारमध्ये चक्कर मारल्यावर आमचा परतीचा प्रवास सुरू होई. संधीप्रकाश आल्याने रस्त्यावरचे चेहरे थोडे अंधुक होऊ लागत. मग आम्ही तडक हनुमान मंदिरात जात असू. मारूतीचे निस्सीम भक्त वगैरे नसलो तरी वारणानगरमधल्या या एकमेव देवळात दिवसातून एकदातरी पाऊल ठेवल्याखेरीज आम्हाला चैन पडत नसे. वारणानगर सोडल्यानंतरही मी जेव्हा-जेव्हा वारणेत गेलो तेव्हा माझी सुरूवात मंदिराने होई. सर्वप्रथम मंदिरात जाऊन मारूतीला नमस्कार करणे, घंटा वाजवणे, एक प्रदक्षिणा

घालणे व थोडा वेळ तिथल्या पायरीवर बसणे हे सर्व केल्यावरच वारणानगरमध्ये आलोय असे feeling येऊ लागे.

खरे तर मारूती हा ब्रह्मचाऱ्यांचा देव. संसार वगैरे भानगडीत पडण्यापूर्वी (आणि नंतरही) शरीरसंपदा बलिष्ठ करणे, मनाचीही शुद्धी करणे ही मारूतीची शिकवण. आणि ही शिकवण आम्हाला मान्य होती. पण आमच्यासाठी या देवळाचे माहात्म्य "लाईन मारण्याचे अजून एक स्थळ" असेही होते! मारूतीच्या देवळात झाडून सगळे वारणानगर येत असल्याने हव्या त्या व्यक्तीचे दर्शन घेण्यासाठी ते हुकमी ठिकाण होते. विशेषतः शनिवारी तर भाविक स्त्रिया व मुलींची तिथे झुंबड उडे. त्यांच्यासाठी मारूतीची शिकवण काय होती हे आम्हाला नीटसे कळले नाही. "चांगला सुदृढ नवरा किंवा मित्र मिळावा" अशा हेतूने त्या तिथे येत असाव्यात अशी आम्ही आमची सोयीस्कर समजूत करून घेत असू. अगदी काहीच नाही तर चिखलकर गुरूजींनी दिलेले ओल्या नारळाचे मिळेल तितके खोबरे हस्तगत करणे ही आमची दर शनिवारची कमाई असायची.

प्राचार्यांच्या धाकामुळे कॉलेज कॉलनीतले गल्ली क्रिकेट बंद पडले तरी इतर काही उद्योग चालू असायचे. रिंग खेळणे हा एक प्रकार नंतर सुरू झाला. नेटच्या दोन बाजूला दोघा-दोघांची टीम उभी करून हा खेळ व्हॉलीबॉलसारखा खेळला जायचा. बरेचसे वयस्कर लोक, प्राध्यापकांच्या बायका – म्हणजे त्या काळातल्या आमच्या काकू आणि मावश्या – हा खेळ खेळत. त्यांना प्रोत्साहन द्यायला किंवा गेम जिंकण्यात मदत करायला मिलिंद आणि मीही कधी-कधी सामील होत असू. या खेळामुळे कधी अचानक कोणाकडे तरी पाहुणी म्हणून आलेल्या एखाद्या मुलीची त्यामुळे ओळख होई हा आमच्यासाठी बोनस होता! जाधवकाकूंकडे आलेली राजलक्ष्मी ही त्यातलीच. काही महिनेच ती वारणानगरमध्ये होती, पण त्या अल्पकाळात आमचे रिंग खेळातले कौशल्य कित्येक पटीने वाढले!

आम्ही कॉलेजकुमार झालो त्या सुमारास वारणानगरमध्ये टू-व्हीलर येण्यास सुरूवात झाली. मिलिंदनेच मला माझी पहिली टू-व्हीलर – Kinetic कंपनीची ल्यूना – चालवायला शिकवली. मला सायकल चालवायला येत होतीच. अर्थात ही ल्यूना माझी नव्हती. कोणाची होती हेही आठवत नाही! कदाचित मिलिंदचीच असेल! पण ती मिळाली की मी आणि मिलिंद वारणेत कधी-कधी फिरायचो, आणि एखादी राजलक्ष्मीसारखी आवडती मुलगी रस्त्यावर दिसली की मुद्दाम तिच्यावर इम्प्रेशन टाकायला भरधाव जायचो. आजही मुले मोटरसायकली मुलींच्या समोरून मुद्दाम भरधाव नेतात. इतक्या फास्ट गेल्यावर त्या मुलीला जर तुम्ही दिसतही नसाल तर तसे करण्यात काय पॉईंट आहे हे कोडे आजही मला उलगडलेले नाही!

सायकल शिकवण्यावरून एक गंमत आठवली. परंपरेनुसार माझ्या धाकट्या बहिणीला – अंजूला – सायकल शिकवायची जबाबदारी माझ्याकडे आली. वर उल्लेखिलेला साखर कारखान्याचा मोठा गाडीतळ उन्हाळ्यात रिकामा असायचा, कारण कारखानाही बंद असायचा. मग तिथे मी अंजूला सायकल शिकवायला घेऊन जात असे. तिला सायकलवर बसवून द्यायला आणि उतरायला मदत लागायची. एकदा सायकलला गती मिळाली की ती मदतीशिवाय चालवत राहायची. पण उतरता येत नसल्यामुळे मला सतत तिच्यामागे धावत जावे लागायचे. एकदा असे धावून धावून मी दमलो की कंटाळलो आणि तिला सायकलवर चढवून दिल्यावर तिच्यामागे गेलोच नाही. थोडावेळ ती गोल फिरत राहिली आणि शेवटी रडत ओरडत धाडकन धुळीत पडली! “आपुले मरण देखिले म्यां आपुल्या डोळा” असे काहीसे तिचे झाले! अर्थात तिने तिचा सायकल शिक्षक ताबडतोब बदलला!

वारणेतला गणेशोत्सव हे एक मोठे प्रकरण होते. लोकमान्य टिळकांनी सांगितल्याप्रमाणे १० दिवस भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम असायचे. हे सर्व

कार्यक्रम top-of-the-line म्हणजे पुण्या-मुंबईच्या दर्जाचे असत. बाबासाहेब पुरंदरे, शिवाजीराव भोसले यांसारखे मातब्बर वक्ते त्यांच्या वक्तृत्वाने भारावून टाकायचे. आणि रात्री प्राथमिक शाळेजवळ आणि दवाखान्यासमोर असलेल्या भव्य पटांगणात अश्रूंची झाली फुले, तो मी नव्हेच, संगीत शारदा यांसारखी अव्वल दर्जाची नाटके असत. तीही मुंबईच्या नाट्यसंपदा यांसारख्या नाटक कंपन्यांनी बसवलेली. आम्हा सर्वांना नाटकात रस तर होताच. झाडून सारे वारणानगर या नाटकांना जमा होई. त्यामुळे सर्व मुली त्यांच्या कुटुंबियांसमवते आलेल्या असत. त्या गर्दीत आमच्या लाडक्या मुली शोधणे हा आमचा मोठा विरंगुळा होता.

शिंगटे बाईंनी – म्हणजे कॉलेजचे प्राचार्य शिंगटे यांची पत्नी – कॉलेज कॉलनीतल्या मुलांसाठी चिल्ड्रन्स क्लब नावाचा उपक्रम सुरू केला. मला वाटतं रविवारी आम्ही एका हॉलमध्ये भेटत असू. तिथे विविध प्रकारचे खेळ खेळणे, कोडी सोडवणे, माहितीवजा गप्पा ऐकणे असे कार्यक्रम असत. मुलांची बौद्धिक व सांस्कृतिक प्रगती व्हावी हा मुख्य हेतू होता. मला आठवते, एकदा शिंगटे काकूंनी आम्हाला University का असाच काहीतरी लांबलचक शब्द दिला व सांगितले की प्रत्येकाने घरी जाऊन या शब्दातलीच अक्षरे वापरून जमतील तितके नवीन शब्द बनवायचे व पुढच्या रविवारी घेऊन यायचे. डिक्शनरीची मदत घ्यायची परवानगी होती. या स्पर्धेत माझे सर्वाधिक शब्द आले! डिक्शनरी कशी वापरायची एव्हढे तरी मला अवगत आहे हे त्यातून सिद्ध झाले!

या क्लबच्या निमित्ताने कॉलनीतल्या सर्व वयाच्या सर्वच मुलामुलींशी माझी छान ओळख व मैत्री झाली. माझ्या वयाचा एकमेव महेंद्र – जो बहुधा कुठल्याच गँगमध्ये नसायचा, एकटाच असायचा – या क्लबमुळे माझ्या अधिक जवळ आला. महेंद्रला गाड्यांची – म्हणजे कार, ट्रक इत्यादी – भयंकर आवड व ज्ञानही होते. सगळी मॉडेल्स व त्यांची वैशिष्ट्ये त्याला माहित असायची. वारणेत गाड्या हा प्रकार खूपच कमी होता. फक्त

चेअरमन, डायरेक्टर लोकांच्या गाड्या व कारखान्याच्या काही जीप्स वगैरे होत्या. बाकी सगळे पायी किंवा सायकलवर फिरायचे. खुद्द आमच्या घरी सर्व पाच जणांना मिळून एक लेडीज सायकल होती. महेंद्रला गाड्यांचे हे ज्ञान कसे मिळायचे हे मला कोडे आहे. एकदा मी Diesel हा शब्द डायसेल असा वाचला तेव्हा लगेच महेंद्रने "डायसेल नाही डिझेल" असे सांगून दुरूस्त केला!

मिलिंदचा भाऊ राहुल त्याच्यापेक्षा एकच वर्षाने लहान होता. मिलिंद जितका शांत आणि सरळमार्गी होता तितकाच राहुल वांड आणि खोडकर होता. त्याच्या चेहऱ्यावर कायम एक मिश्कील हसू असे, जणू हे सगळे जग एक विनोदच आहे! त्याच्या चेहऱ्याकडे नुसते पाहिले तरी तो काही बोलण्याआधीच मला हसू लोटायचे. तो एक नंबरचा टवाळखोरही होताच. कोणीही त्याच्या बारीक नजरेतून सुटत नसे! राहुलच्या खोड्यांमुळे तो शाळेत सर्वपरिचित होता. विशेषतः शाळेतले शिपाई त्याला चांगलाच ओळखत. कारण बऱ्याचदा काहीतरी खोडी केल्याबद्दल राहुल शिक्षा म्हणून वर्गाबाहेर उभा असे! खरं म्हणजे राहुल इतरांना हसवून स्वतः नामानिराळा राही. तो असा चेहरा करी मी त्या गावचाच नव्हे. पण शिक्षकांना त्याचे हे कसब अवगत झाले होते!

क्लबच्या निमित्ताने मिलिंदच्या शेजारी राहाणाऱ्या पोतनीस भगिनी – म्हणजे यशस्विनी व तेजस्विनी – यांचीही चांगली ओळख/मैत्री झाली. दोघीही माझ्यापेक्षा लहान. त्यांची धाकटी बहिण प्रियदर्शिनी खूपच लहान असल्याने आमच्या रडारवर नव्हती. (पुढे मोठी झाल्यावर ती तिच्या medical field मधल्या कामामुळे बरीच थोर झाली हे नमूद केलेच पाहिजे.) तेजस्विनी नावाप्रमाणेच तेजस्वी स्वभावाची होती. कुणाचे पावशेर खपवून न घेणारी अशी होती. माझी मोठी बहीण सीमा ही देखील तशीच, म्हणजे कुणाचीही दयामाया न करणारी, थोडीशी रागीटच म्हणता येईल अशी होती. साहजिकच तेजूचे आणि माझ्या बहिणींचे काही सूत जमले

नाही. त्यांची नेहमी भांडणे व्हायची. एकदा गंमत झाली. शाळेतून घरी परत येताना मी माझ्या बहिणींबरोबर येत होतो. पोतनीस भगिनीही पुढे-मागे होत्या. काहीतरी कारणाने सीमाची आणि तेजूची जुंपली. इतकी की प्रकरण हातघाईवर आले. मी आपला दुरून हतबुद्ध होऊन पाहात होतो. तेव्हढ्यात सीमा माझ्यावर ओरडली, "काय रे, भाऊ असून नुस्ता बघतोस काय गंमत! मार तिला!" मी चक्रावलोच. आता काय करावे! मोठ्या बहिणीचे ऐकायचे असे संस्कार होते! नाईलाजाने मी शाबासकी देतात तशी अगदी हळू चापटी तेजूच्या हातावर मारली. झाले! तेजू तडक माझ्या आईकडे गेली आणि "अभयने मारले" अशी तक्रार नोंदवली. मी घरी पोचल्यावर आईने तिच्या नेहमीच्या पद्धतीने मला देवघरासमोर नेऊन देवासमोर नाक घासायला लावून "असे पुन्हा करणार नाही" अशी माफी मागायला लावली!

त्यानंतर मी माझ्या बहिणींबरोबर शाळेत जाणे-येणेच काय, फिरायला जाणेही सोडले!

मिलिंदच्या अनेक बेस्ट फ्रेंड्सपैकी एक म्हणता येईल असा म्हणजे सतेज देसाई. सतेज मिलिंदच्याच वयाचा म्हणजे माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा होता. तो मला वेगवेगळे जीवनोपयोगी सल्ले देत राहायचा. "पोरगी पटवायला बॉडी चांगली पाहिजे. बिल्डर लोकांना पोरी लगेच पटतात" हा एक त्याचा मौलिक सल्ला. अर्थातच पेपरात, मासिकांत येणाऱ्या जाहिराती पाहिल्यावर ते पटण्यासारखेही होते. मिलिंदच्याच प्रोत्साहनाने मग माझे वारणेतल्या व्यायामशाळेत जाणेयेणे सुरू झाले. वारणानगरमधल्या अनेक जगावेगळ्या गोष्टींप्रमाणे ही व्यायामशाळा देखील अजब होती. तिचे दोन भाग होते: एका भागात चक्क लाल मातीचा आखाडा होता आणि त्यात लंगोटी नेसलेले पहेलवान (किंवा होऊ इच्छिणारे) शड्डू ठोकत. त्या व्यायामप्रकाराला पूरक मलखांब, पट्टा अशी साधने होती. व्यायामशाळेच्या दुसऱ्या भागात अत्याधुनिक पाश्चात्य पद्धतीची बेंच प्रेस, ट्रेड मिल, वेट

लिफ्टिंग असली उपकरणे होती. सतेज/मिलिंद अर्थातच हा “वजनदार” व्यायाम करत. व्यायामशाळेचे प्रमुख “भारत श्री” शरीरसौष्ठव स्पर्धा जिंकलेले बिभीषण पाटील नावाचे गोरेपान व अतिशय देखणे गृहस्थ होते. वारणेतल्या पोरीबाळी ज्या प्रकारे बिभीषण पाटलांकडे पाहून उसासे टाकत व त्यांच्या बायकोचा दुस्वास करत हे पाहून सतेजचा सल्ला अजूनच सार्थ आहे हे पटायचे!

बारावीनंतर मला वालचंद इंजिनियरींग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. माझ्यासाठी आनंदाची गोष्ट म्हणजे तिथे मिलिंद आधीच होता. त्याच्यामुळे या नवीन वातावरणात स्थिरस्थावर होणे मला खूपच सोपे गेले. मला सर्वात मोठी चिंता आता मित्र कसे मिळवायचे अशी होती. त्यावेळी मिलिंदने म्हटलेले एक वाक्य अजून मी विसरलो नाही. तो म्हणाला, “अभय, मित्र मिळवणे सोपे असते. ओळखी पटापट होतात. पण मित्र टिकवणे अवघड असते!” अर्थात त्याचे ते स्वानुभवाचे बोल होते. मिलिंदच्या magnetic व्यक्तिमत्वामुळे त्याचे असंख्य मित्र होते. त्याच्या ओळखीमुळे मलाही नवीन मित्र पटापट मिळाले. पण त्यातले हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच मी टिकवू शकलो.

वालचंदमध्ये म्हणजे सांगलीत मी एकच वर्ष होतो. पण ते वर्ष अविस्मरणीय ठरले. वालचंदच्या आर्ट सर्कलमध्ये माझा व्हायलिन घासण्याच्या कौशल्यामुळे झालेला प्रवेश हे एक कारण होते. आर्ट सर्कलमुळेच तिलवल्ली नावाच्या सरांशी – ज्यांना कुठल्याही angle मधून वल्ली म्हणणे चुकीचे ठरले असते – ओळख होणे व त्यांच्यामुळे शास्त्रीय संगीतातले बारकावे शिकायला मिळणे हेही एक कारण होते. पण सर्वात मोठा वाटा मिलिंदचा होता. त्याच्याबरोबर “कर्ज” सारखे सिनेमे पाहाणे, कविता वाचणे, विलिंग्डनच्या मुली टेहळणे, कुठे-कुठे खादी करण्यास जाणे किंवा निव्वळ गप्पा मारणे हे सर्व माझ्या growing up प्रक्रियेसाठी अत्यावश्यक होते. आईवडिलांपासून दूर राहण्याचा हा माझा पहिलाच

अनुभव होता. वालचंदच्या या एका वर्षात माझा आत्मविश्वास इतका घट्ट झाला व एकंदर बाहेरच्या जगाविषयी भीती तर सोडाच, इतके प्रेम उत्पन्न झाले की नंतर मी कधीच परत वारणानगरला दीर्घ वास्तव्यासाठी गेलो नाही; तेव्हढा homesickness मला जाणवला नाही.

इंजिनियरिंगनंतर मिलिंदची काही वर्षे खडतर गेली. कोल्हापुरात Mechanical Engineer या सदराखाली त्याने छोट्या-मोठ्या कंपन्यांत कामे केली. पण त्यात त्याचा काही जम बसेना. त्याचे मनही त्यात लागेना. अशा अवस्थेत त्याची एक नोकरीही गेली. आर्थिक मंदीचे दिवस असल्याने नवीन नोकरी मिळवणे कठीण होते. विमनस्क अवस्थेत तो कोल्हापूर शहरात वणवण हिंडला. काय करावे, काय करावे या विचारात, करीयरच्या, आयुष्याच्या विवंचनेत. एके दिवशी दार वाजले म्हणून त्याने उघडले तर एक अनोळखी स्त्री उभी होती. ती म्हणाली, “सर, तुम्ही माझ्या मुलाला गणित शिकवाल का? तो खूप अडचणीत आहे.” मिलिंद चकित झाला. तो गणितच काय, कुठलाच विषय शिकवण्याच्या भानगडीत आजवर पडला नव्हता. ही बाई अशी आपल्याकडे कशी काय आली? पण तिला नकार देऊन परत पाठवण्याऐवजी “पाहू तरी या मुलाला काय मदत पाहिजे” असा विचार करून तो म्हणाला, “पाठवून द्या तुमच्या मुलाला.”

मिलिंदच्या स्वप्नातदेखील नव्हते की हा चमत्कारिक आणि अनपेक्षित प्रसंग त्याच्या आयुष्याला संपूर्ण कलाटणी, एक नवीन दिशा देईल. त्या मुलाला त्याच्या तात्कालिक अडचणीतून सोडवल्यानंतर मिलिंदने गणिताचे वर्ग सुरू केले. एकापाठोपाठ एक अशा घटना घडत गेल्या आणि काही वर्षात कोल्हापुरात “तोरो इन्स्टिट्यूट” उभी राहिली. केवळ हुशार मुलांना शिकवणे असा फोकस मिलिंदने ठेवला आणि स्कॉलरशिपच्या परीक्षा, आय.आय.टी. ची JEE प्रवेश-परीक्षा, भाभा टॅलेंट परीक्षा अशा अवघड परीक्षांसाठी गणित, भौतिकशास्त्र असे महाकठीण विषय शिकवणे हा

उपक्रम त्याने सुरू केला. त्याचा करीयरचा प्रश्न तर सुटलाच. शिवाय त्याला त्याच्या बुद्धिमत्तेला योग्य असे काम मिळाले. ज्या स्पर्धा-परीक्षा केवळ प्रयत्न करून पाहायलाही लोक घाबरतात अशी परीक्षांसाठी कुशल मार्गदर्शन करणे ही काही चेष्टा नाही. दरवर्षी या सर्व परीक्षांत मिलिंदचे विद्यार्थी त्याला अभिमान वाटेल असे यश मिळवतात.

मिलिंद इतर क्लासेसप्रमाणे केवळ मुलांना लेक्चर्स व नोट्स देऊन मोकळा होत नाही. त्याचे त्याच्या विद्यार्थ्यांशी घट्ट नाते निर्माण होते. त्यांच्याबरोबर तो कधीकधी परीक्षा-स्थळांपाशी जातो व त्यांना उत्तेजन देतो. मुलांबरोबर भारतातील intereting ठिकाणी तो सहली काढतो. तिथल्या मनोरंजक गोष्टी – विशेषतः ज्यांच्या मागे काही शास्त्र वा गणित आहे – दाखवून त्यांचे मर्म समजावून सांगतो व त्यांच्या बुद्धीला चालना देतो. मिलिंदच्या घरी मी जेव्हा जातो तेव्हा त्याच्या बाहेरच्या खोलीतच सर्वत्र गणित, शास्त्र या विषयांवरची अतिप्रगत पुस्तके किंवा मासिके पसरलेली असतात. मिलिंदचे घर हा एक आधुनिक बुद्धिजीवी आश्रमच वाटतो, जिथे बौद्धिक आळसाला स्थान नाही. अर्थात मी मिलिंदशी बौद्धिक दोन हात करण्याच्या भानगडीत पडत नाही. एक-दोन पुस्तके वरवर चाळून त्यांचे शेवटचे पान न्याहाळल्यावर मी तिथून त्याला बाहेर काढतो व कोल्हापुरातील ओपल, पर्ल अशा रेस्टॉरंटमध्ये घेऊन जातो. मग बियरचे किंवा तत्सम रंगीत पेयाचे घुटके घेत वारणानगरच्या आठवणींत आम्ही दोघे रमून जातो.

*लेखक: अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com)*


Milind 2nd from right. At his daughter's wedding, with a few Walchand friends (2019)